# प्रधानमंत्री किसान सम्मान निधी उत्सव २०२५

जे एन आय ई एस टी आर कृषी विज्ञान केंद्र पोखरणी नांदेड व महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम किसान सन्मान निधी व शेतकरी शास्त्रज्ञ संवाद उत्साहात संपन्न...... नांदेड जिल्ह्यातील १९ गावातील २०० पेक्षा जास्त शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदवून शास्त्रज्ञाशी संवाद साधला.

नांदेड दि.2 ऑगस्ट 2025 रोजी कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी, नांदेड, महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि आत्मा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने "प्रधानमंत्री किसान सन्मान निधी" वाटपाचा २० व्या हप्त्याचे वितरण कार्यक्रमानिमित्त शेतकरी व शास्त्रज्ञ संवाद या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड- १ येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाची सुरुवात कृषी अनुसंधान परिषद गीताने करण्यात आली असून कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र चे संचालक डॉ.एस.डी.मोरे सर उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.दत्तकुमार कळसाईत, ता.कृ.अ.श्री.भगवान तवर, मं.कृ अ.श्री.सानप हे देखील त्यावेळी उपस्थित होते. सदरील कार्यक्रमासाठी १९ गावातील एकूण २०० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सुरुवात बळीराजाच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.जारीकोटे (सहाय्यक कृषी अधिकारी) यांनी तर प्रास्ताविक डॉ.डी.ए.देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत शेतकऱ्यांच्या जाणून घेतलेल्या समस्यांचा आढावा व त्यावर उपाययोजना आणि तंत्रज्ञान यावर सखोल असे मार्गदर्शन करून शास्त्रज्ञांच्या संशोधनाची दिशा शेतकऱ्यांच्या समस्येनुसार ठरवली जाईल, तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन वैयक्तिक सल्ला व मार्गदर्शन देखील आम्ही करू असे आवाहन त्यांनी त्यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना करण्यात आले. त्यानंतर श्री.दत्तकुमार कळसाईत यांनी शेतमाल प्रक्रिया उद्योग,महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना आणि योजनांचे लाभार्थी बनण्यासाठी शेतकरी ओळख पत्राची गरज,शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना,फळबाग लागवड योजना याबद्दल माहिती सांगून शेतकऱ्यांनी वेळोवेळी कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्र अशी जोडून योजनांचा प्रशिक्षणाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ घेऊन कमी खर्चात चांगले उत्पन्न घेण्याकडे वाटचाल करावी असे आवाहन त्यावेळी शेतकऱ्यांना करण्यात आले. तसेच कृषी विद्या तज्ञ प्रा.एस.एच.जायभाये यांनी कीड व रोग नियंत्रण, जैविक निविष्ठा तयार करणे व त्यांचा वापर घनकचरा न जाळता शेतात कुजवल्याने खतावर होणाऱ्या खर्चामध्ये बचत करता येईल,तसेच दिवसेंदिवस जमिनीचा पोत ढासळणार नाही आणि त्याचा आरोग्यावर देखील दुष्परिणाम कमी होऊन वाढत्या आजारांचे प्रमाण आटोक्यात येईल, असे त्यावेळी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले.शेतकऱ्यांनी देखील आपल्या मनोगतामध्ये शेतीतील समस्या आणि शेतकऱ्यांना शेतीमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार मिळावा तसेच शेती पिकामध्ये शेतकऱ्यांनी एकमताने वेगवेगळी पिके घेण्याचा निर्णय घेतला तर बाजारात शेतीमालाला व्यवस्थित

बाजारभाव देखील मिळेल असे त्यावेळी सुचवले. तसेच रासायनिक शेतीमुळे अन्नधान्याची गुणवत्ता देखील ढासळत चाललेली आहे आणि त्यावर उपाय म्हणून नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे काळाची गरज बनली आहे असे सांगितले. अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पशुवैद्यक तज्ञ डॉ.एम.एन.अंबोरे यांनी केले असून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सदरील कार्यक्रमासाठी कृषी विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी तसेच उप कृषी अधिकारी यांची देखील विशेष उपस्थिती लाभली.




















पीएम किसान सम्मान निधि


पीएम किसान सम्मान निधि
सुस्वागतम